N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT
**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District** (जिल्हा): नवी मुंबई **P.S.**(ठाणे): पनवेल शहर

**FIR No.**(प्रथम खबर क्र.): 0127 **Year** (वर्ष): 2024

**Date and Time of FIR** (प्र. ख. दिनांक आणि वेळ):15/03/2024 05:02

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7(a) |

3. (a) **Occurrence of offence** (गुन्ह्याची घटना):

1. **Day**(दिवस): दरमियानी दिन **Date From** (दिनांक पासून): 04/03/2024
**Time Period** (कालावधी): **Date To** ( दिनांक पर्यंत): 14/03/2024
**Time From** (वेळेपासून): 15:27 बजे
**Time To** (वेळेपर्यंत): 17:44 बजे

(b) **Information received at P.S.** (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):
**Date** (दिनांक ): 15/03/2024 **Time** (वेळ): 04:00 बजे

(c) **General Diary Reference** (रोजनामचा संदर्भ ):
**Entry No.** (नोंद क्र.): 005
**Date & Time** (दिनांक आणि वेळ): 15/03/2024 05:01 बजे

4. **Type of Information** (माहितीचा प्रकार): लेखी

5. **Place of Occurrence** (घटनास्थळ):

1.(a) **Direction and distance from P.S.**(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):
उत्तर, 1 किमी **Beat No.** (बिट क्र.):

(b) **Address** (पत्ता): पडताळणी व सापळा कारवाई, पनवेल तहसिल कार्यालय

(c) **In case, outside the limit of this Police Station, then** (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):
**Name of P.S.**(पोलीस ठाण्याचे नाव):
**District(State)** (जिल्हा(राज्य)):



Scanned with OKEN Scanner

**6. Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** जयदास कमलाकर गायकर

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1987

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | घर नं 75, मु गिरवले, पो सोमाटणे, ता पनवेल, जि र,पनवेल शहर ,नवी मुंबई,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | घर नं 75, मु गिरवले, पो सोमाटणे, ता पनवेल, जि र,पनवेल शहर ,नवी मुंबई,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-9833086701

**7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | किरण अर्जुन गोरे | | | 1. क्लासिक कल्पतरु हौसोसायटी,, रुम नं 004, सेक्टर 16, नवीन पनवेल, ता पनवेल ,पनवेल शहर ,नवी मुंबई, महाराष्ट्र,भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

**9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|



Scanned with OKEN Scanner

10 **Total value of property (In Rs/-)**
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
| --- | --- |

12.**First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

पनवेल तहसिल कार्यालय
पनवेल, दिनांक 15/03/2024

मी जयदास कमलाकर गायकर, वय- 37 वर्षे, नोकरी - डी.एच.एल. खासगी कंपनीमध्ये, राहणार घर नं. 75, मु. गिरवले, पो. सोमाटणे, ता. पनवेल, जि. रायगड, मो. नं. 9833086701 असा असून पोनि संतोष पाटील, अँन्टी करप्शन ब्युरो नवी मुंबई यांचे समक्ष जबाब लिहुन देतो की,

मी वर नमुद प्रमाणे असुन वरील ठिकाणी माझे मुळ गावी कुटूंबियांस राहण्यास आहे. मी डी.एच.एल. खासगी कंपनीमध्ये सी.सी.टी.व्ही. ऑपरेटर म्हणून काम करीत आहे.

माझे वडीलोपार्जित मौजे गिरवले, ता. पनवेल, जि. रायगड येथील सव्र्हे नं. 44, एकूण क्षेत्र पोट खराब्यासहीत 0-34-90 हे.आर.पॉ व सर्वे नं. 94/2 एकूण क्षेत्र पोट खराब्यासहीत 0-73-40 हे.आर.पॉ ही जमिन माझे वडील नामे कमल्या उर्फ कमलाकर चांगो गायकर यांना कुळ कायदा प्रमाणे प्राप्त झाली होती. सदर जमिनीचे मुंबई कुळवहिवाट व षेतजमिनी कायदयान्वये नोंद कमी करून सदरची जमिन भोगवटादार वर्ग-1 प्रमाणे नोंद करण्यासाठी माझे वडीलांच्या नावे मा. तहसिलदार, पनवेल, जि. रायगड यांचे कार्यालयात दिनांक 03/01/2024 रोजी अर्ज स्वहस्ते सादर केला होता.

त्यानंतर मी वेळोवेळी तहसिल कार्यालय पनवेल येथे जावून सदर अर्जाच्या अनुशंगाने चौकशी करीत होतो. परंतु अर्जावर कोणतीही कारवाई न झाल्याने मी दिनांक 09/02/2024 रोजी तहसिल कार्यायल, पनवेल येथील किरण गोरे, महसूल सहायक यांना भेटून माझे वडीलांनी दिलेल्या अर्जाबाबत चौकशी केली. त्यावेळी किरण गोरे यांनी त्यांच्याकडे अर्ज प्राप्त नसल्याचे सांगितले होते. परंतु मी आवक जावक शाखेमधून माहिती घेवून अर्ज किरण गोरे यांच्याकडेच आला असल्याबाबत त्यांना सांगितले. त्यावेळी किरण गोरे, महसूल सहायक यांनी त्यांचे टेबलावर असलेला अर्ज बघून मला जमिनीचे क्षेत्राबाबत विचारणा केली. त्यावेळी मी त्यांना सुमारे अडीच एकर क्षेत्र असल्याचे सांगितले असता, किरण गोरे यांनी प्रत्येक एकर प्रमाणे रू. 40,000/- दयावे लागतील असे मला सांगितले. त्यावर मी त्यांना रक्कमेचे सर्व शासकीय फी भरणा केले असल्याचे सांगितले असता, त्यांनी मला 40,000/- रूपये एकर प्रमाणे संपुर्ण फाईलचे एक लाख रूपये दयावे लागेल असे सांगितले. त्यावर मी त्यांना माझेकडे इतकी रक्कम नसल्याचे सांगितले असता, त्यांनी अर्ज बाजूला ठेवून मला 2 महिन्यानंतर बघूया असे सांगून जाण्यास सांगितले. तरी तहसिल कार्यालय, पनवेल येथील महसूल सहायक किरण गोरे यांनी मागणी केलेली रक्कम ही लाच असून सदरची रक्कम मी त्यांना दिली नाही तर ते आमचे जमिनीचे मुंबई कुळवहिवाट व शेतजमिनी कायदयान्वये नोंद कमी करून सदरची जमिन भोगवटादार वर्ग-1 प्रमाणे नोंद घेण्यास दिरंगाई करतील अथवा व्यत्यय आणतील अशी माझी खात्री झालेली आहे. तहसिल कार्यालय, पनवेल येथील महसूल सहायक किरण गोरे यांनी मागणी केलेली लाचेची रक्कम त्यांनी देण्याची माझी मुळीच ईच्छा नसल्याने तहसिल कार्यालय, पनवेल येथील महसूल सहायक श्री. किरण गोरे यांच्या विरुध्द योग्य ती कायदेशिर कारवाई होणेबाबत मी दिनांक 04/03/2024 रोजी अँन्टी करप्शन ब्युरो, नवी मुंबई कार्यालयात समक्ष हजर राहून तक्रार दिली होती.

दिनांक 04/03/2024 रोजी मी दिलेल्या तक्रारीच्या अनुशंगाने लाचेची पडताळणी करणेकामी पोनि. संतोष पाटील यांनी मागणी केल्याप्रमाणे सी, विभाग वाशी, महानगर पालिका कार्यालय ,नवी मुंबई कार्यालयाकडुन दोन शासकीय पंच हजर झाले. त्यानंतर पंचासमक्ष माझे तक्रारीच्या अनुशंगाने लाचेच्या मागणीची पडताळणी करण्याचे ठरविण्यात आले. त्याप्रमाणे मी डिजीटल व्हॉईस रेकॉर्डसह पंच क्र. 1 श्री. जोशी, यांचे समवेत तहसिल कार्यालय, पनवेल येथील श्री. किरण गोरे, महसुल सहाय्यक यांना पनवेल तहसिल कार्यालयात भेटण्यासाठी गेलो. त्यावेळी मला किरण गोरे महसुल सहाय्यक हे भेटले असता माझी माझे कामाबद्दल चर्चा झाल्यानंतर श्री. किरण गोरे यांनी मला माझी



Scanned with OKEN Scanner

फाईल नायब तहसिलदार श्रीमती राजश्री जोगी मॅडमकडे पाठविली असुन त्यांचेकडे जावुन फाईलचे काम करुन घ्या असे सांगितले. त्यावेळी मी माझे फाईल संदर्भात नायब तहसिलदार श्रीमती राजश्री जोगी यांना भेटुन माझे फाईलचे कामाबाबत विचारले असता, त्यावेळी श्रीमती जोगी यांनी 'फाईल बघुन सांगते असे मला सांगितले. त्यामुळे मी पुन्हा माझे फाईलच्या संदर्भात काहीवेळाने श्री. किरण गोरे यांना भेटलो.

त्यावेळी मी किरण गोरे यांना माझेकडे यापुर्वी मागण्यात आलेली लाचेची रक्क्कम ही जास्त आहे याबाबत बोललो असता, किरण गोरे यांनी ''त्याच्यात माझेकडे अधिकार नाहीत ना..मग त्याचेत कमी करायला'' असे मला सांगितले. त्यावर मी, किरण गोरे यांना ''बोला ना काय आहे ते'' असे बोलून किरण गोरे यांनी यापुर्वी माझकडे मागणी केलेल्या रक्कमेच्या अनुशंगाने विचारणा केली. त्यावेळी किरण गोरे यांनी " एक गोष्ट लक्षात ठेवा....मी तेव्हाही तुम्हांला सांगितलय...मला आतमध्ये कमी दयायला लागतील बरोबर .... ते काय म्हणणार समोरच्याने बरोबर दिले असतील.....यांनी कमी केले अस सागणार बघा" असे मला सांगितले. त्यावर मी, किरण गोरे यांना एक अपेक्षित रक्कम ठरवुन किती दयावी लागेल याबाबत विचारले असता, किरण गोरे यांनी मला '' मी त्यासाठी तुम्हांला सांगितल ते त्यात काय कमी नाय होणार...'' असे बोलुन मी, किरण गोरे यांना लाचेच्या रक्कमसंदर्भाने ''पस्तीस हजार.....'' दयावे लागतील अशी विचारणा केली असता, किरण गोरे यांनी ''ऐकरी पस्तीस''दयावे लागतील असे मला सांगितले. त्यावेळी मी, सदरची रक्कम जास्त असुन कमी करावी किरण गोरे यांना विनंती केली असता, किरण गोरे यांनी माझेकडे जमिनीचे एकूण क्षेत्राबाबत विचारणा केली. त्यावर मी मी, किरण गोरे यांना " हो अडीच ऐकर..... मी तसा नाय म्हणत तुम्ही एकदम कन्सीडर नका करू....अँटलीस्ट लमसम सांगा ना.....ऐकरी चाळीस हजार आण्णा खूप होतय....मान्य आहे की एखादा म्हणजे बिल्डर असता तर गोष्ट वेगळी होती.... बाबांची जागा आहे ना ओ आमचे वडीलांचीच आहे" असे बोलून रक्कम कमी करण्याबाबत किरण गोरे यांच्याकडे विनंती केली. त्यावर किरण गोरे यांनी मला जमीनीचे काम मॅडम म्हणजे राजश्री जोगी यांचेकडुन करुन घ्यायला सांगितले. त्यांनंतर मी पुन्हा माझे फाईलचे पुर्ण काम करुन देण्याकरीता किरण गोरे यांना एक अपेक्षीत रक्कम कळण्यासंदर्भात बोललो असतो, त्यावेळी ' चाळीस' असे किरण गोरे यांनी लाचेची रक्कम देयाला लागेल असे मला बोलले. त्यावेळी मी किरण गोरे यांना माझी जमीन पुर्ण अडीच एकर नसुन ती एकशे तीन गुठ्ठे आहे असे सांगितले असता, त्यावेळी किरण गोरे यांनी मला'' हा ऐकरी पस्तीस सांगितले.....किती होतात....'' असे सांगुन ''पस्तीस दुणे सत्तर आणि आर्धा...'' असे बोलुन " सत्तर आणि ते ऐंशी नव्वद" होतात असे मला सांगितले. त्यावर मी किरण गोरे यांच्याकडे खात्री केली असता, किरण गोरे यांनी मला माझे जमीनीचे नव्वद हजार एवढी रक्कम दयायला लागेल असे सांगितले. त्यावेळी मी, किरण गोरे यांना रक्कम जास्त होत असल्याचे सांगून रक्कम कमी करण्याची विनंती केली असता, त्यावेळी किरण गोरे यांनी मला ''काय मी कमी सांगु''व " ऐका ऐका...नव्वद पेक्षा कमी दयायचे सगळे मॅडमकडे दयायचे.....माझेकडे नाय दयायचे मला एक रूपया नको....मी माझा असाच स्वभाव आहे....मी असाच सोडुन देईल घेवून जा मी आत्ता देवून टाकतो " असे मला बोलून त्यांनी स्वतःच्या हिश्शातील दहा हजार रुपये कमी करुन सदरची रक्कम मला न देता नायब तहसिलदार राजश्री जोगी यांना जावुन दयावी लागेल असे सांगितले. तसेच सदरची रक्कम वन टाईम करावी लागेल असे मला सांगिताले. त्यावर मी किरण गोरे यांना '' ऐंशी हजार....'' असे बोलुन मी, " ऐंशी हजार सर कसे होणार मॅनेज एकदाच...." असे सांगितले असता, किरण गोरे यांनी मला ''तु आणून दे चार दिवसांनी दे पाच दिवसांनी दे ....जेव्हा देशील तेव्हा होईल....''असे सांगुन मी, सगळे माझे काम ऐंशी हजार मध्ये डन असे किरण गोरे यांना विचारले असता, त्यांनी '' बाकी मला स्पष्ट सांगितले मी मला काहीही त्यात फायदा नाही आजिबात नाय मला वरती दहा सुटले असते माझे बस बाकीचे त्याचे आहेत त्याच्याकड जातील माझ त्यात काही नाही....पाहीजे तर तु माझ्या समोरच डायरेक्ट मॅडमच्या हातात देवून टाक पाकीट मग तुला खात्री पण होईल की बबा याच काय नाय.त्यात...असे मला सांगितले. त्यानंतर मी सदर रक्कम कोणाकडे देणे बाबत किरण गोरे यांना विचारले असता, त्यावेळी किरण गोरे यांनी ''मी काय म्हटल माझ्या थ्रु गेलास तर मला दयायला लागल.... त्यांच्या थ्रु गेला तर त्यांच्याकडे दे माझा विषयच नाय..'' त्यानंतर मी, किरण गोरे यांना एक चार पाच दिवस लागतील रक्कम गोळा कराला त्यावेळी आठ दिवस घे असे किरण गोरे यांनी मला सांगितले.

त्यानंतर मी सदर काम हे राजश्री जोगी यांचेकडे प्रलंबित असल्याने त्यांचेशी चर्चा करण्याकरीता नायब तहसिलदार श्रीमती राजश्री जोगी यांना भेटावयास गेलो. त्यावेळी श्रीमती राजश्री जोगी यांनी मला माझे प्रकरण पाहुन माझी फाईल मधील कागदपत्रे तपासुन त्यात काही त्रुटी काढुन त्यामध्ये टी.एन.सी विभागातुन बत्तीस एम चे कागदपत्रे आणण्यास सांगुन व फाईल मध्ये पुढील शेरा न मारता बाजुला ठेवली तसेच मला दिनांक 05/03/2024 रोजी कार्यालयात बोलाविले. त्यानंतर मी पडताळणी पथकाच्या ठिकाणी परत आलो. सदरचे संभाशण डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर मधील मेमरीकार्डमध्ये ध्वनीमुद्रीत करण्यात आलेला असुन तसा दिनांक 04/03/2024 रोजीचा सविस्तर पडताळणी पंचनामा करण्यात आलेला आहे.



Scanned with OKEN Scanner

अशाप्रकारे माझेकडे माझे वरील वर्णनाची वडीलोपार्जित सर्वे नं.44 व सर्वे नं. 94/2 या जमिनीचे मुंबई कुळवहिवाट व शेतजमिनी कायदयान्वये नोंद कमी करून सदरची जमिन भोगवटादार वर्ग-1 प्रमाणे नोंद घेण्यासाठी पनवेल तहसिल कार्यालय येथील श्री. किरण गोरे, महसुल सहाय्यक यांनी त्यांचेसाठी तसेच त्यांचे वरिष्ठांसाठी माझेकडे रु. 80,000/- लाचेच्या रक्कमेची मागणी करीत असल्याचे निष्पन्न झालेले आहे. परंतु श्री किरण गोरे यांनी पडताळणी पंचनामा दरम्यान '' पाहीजे तर तु माझ्या समोरच डायरेक्ट मॅडमच्या हातात देवून टाक पाकीट मग तुला खात्री पण होईल" असे सांगितले आहे तसेच नायब तहसिलदार श्रीमती राजश्री जोगी यांनी टी.एन.सी. विभागातुन 32 एम चे सर्टिफिकेट घेऊन बोलाविले असल्याने श्रीमती राजश्री जोगी यांची भेट घेऊन श्रीमती जोगी लाचेची बोलणी करतात किंवा कसे याबाबत सत्यता पडताळणी करण्याचे ठरविण्यात आले.
त्यानंतर दिनांक 05/03/2024 रोजी मला अपर तहसलिदार कार्यालय, पनवेल कार्यालयामधुन माझे जमीनीचा 32 म चा दाखला न मिळाल्याने परंतु श्रीमती जोगी यांनी मला बोलाविलेवरून मी दिनांक 06/03/2024 रोजी नायब तहसिलदार श्रीमती राजश्री जोगी व श्री.किरण गोरे महसुल सहाय्यक यांना भेटण्याकरीता डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरसह पंच क्र. 1 जोशी यांचेसह पनवेल तहसिल कार्यालयात जावून नायब तहसिलदार श्रीमती राजश्री जोगी यांचेसोबत माझे फाईल बाबत चर्चा केली. त्यावेळी नायब तहसिलदार श्रीमती राजश्री जोगी यांनी मला 32 एम चे सर्टिफिकेट आणण्यास सांगितले असता मी त्यांना रजिस्टरवर नोंद मिळून आली असल्याचे सांगितले त्यावर त्यांनी मला बाहेर थांबण्यास सांगितले. त्यानंतर मी बाहेर येवुन किरण गोरे यांना भेटुन माझे फाईल बाबत चर्चा करुन त्यांना मी ''नाय..नाय..सोडतच नाय मी काय म्हणतो ऐकाना त्यादिवशी बोलल्या प्रमाणे केल तर मग होईल...हा... अण्णा..' असे सांगुन'' त्यादिवशी बोलल्या प्रमाणे जर वन टाईम ऐट्टी थावजन्ड दिल तर काम पुढे... सुट्टया पण आहेत महाशिवरात्र आहे शनिवार आहे. नेक्स्ट वीक तर सोमवारी जाणार" असे सांगितले. त्यावेळी श्री किरण गोरे हे मला फाईल आल्यानंतर बघु असे बोलले. त्यानंतर मी त्यांना माझे फाईलचे काम करुन देण्याकरीता एक अपेक्षित रक्कम ठरलेल्याप्रमाणे '' ऐंशी हजार दिले तर होईल ना सर्व..'' अषी विचारणा केली त्यावेळी किरण गोरे यांनी मला '' एकाच वेळेस '' दयावे लागतील असे सांगितले. त्यावेळी मी, सदर रक्कम मध्ये तहसिलदार साहेब, मॅडम व सर्व येतील का असे विचारले असता, किरण गोरे यांनी '' स किरण गोरे यांनी सगळेच ऑल इन वन असे बोलुन मॅंडमशी बोलणे कसे काय झाले माहीती आहे का तेच आधी दिले असते तर मी बोललो असतो ,आता मला बोलता येणार नाही, मॅंडमला ,असे मला सांगीतले की त्यानंतर सदरची फाईल सध्या श्रीमती राजश्री जोगी यांच्याकडे प्रलंबित असल्याने मी पुन्हा त्यांना भेटलो असता त्यांनी मला माझी फाईल मा. तहसिलदार साहेबांचे टेबलवर सहीकरीता असल्याने फाईल जेव्हा परत येईल त्यावेळेस रीतसर प्रकरण बघु असे सांगीतले. सदरचे संभाषण डीजीटल व्हॉईस रेकॉर्डमध्ये मेमरीकार्डमध्ये ध्वनीमुद्रीत करण्यात आलेले असुन तसा दि 06/03/2024रोजीचा सविस्तर पडताळणी पंचनामा करण्यात आलेला आहे. त्यानंतर पुढील आठवडाभर मी अपर तहसिलदार कार्यालयात बत्तीस म दाखला मिळणेकरीता पाठपुरावा करीत होतो. त्यानुसार मला मा. अप्पर तहसिलदार तथा जमिन न्यायाधिकरण पनवेल रायगड या कार्यालयातुन सर्वे नं 94/02या जमिनीचे बत्तीस ग प्रमाणे नजराणा म्हणुन भरलेले रुपये 805 ही दि 18/10/2006रोजीची नोंद / लेजर कॉपी असलेले प्रमाणीत प्रत सदर कार्यालयातुन प्राप्त झाली. त्याबाबत मी दि 14/03/2024रोजी अँटीकरप्शन ब्युरो नवी मुंबई कार्यालयातील पोनि पाटील यांना मोबाईल फोनद्वारे संपर्क करुन कळविलेवरून पडताळणी पथक ठरलेल्या ठीकाणी पंचांसह हजर झाले. त्यानंतर दिलेल्या सुचनांप्रमाणे मी नायब तहसिलदार मॅंडम श्रीमती राजश्री जोगी व श्री किरण गोरे महसुल सहाय्यक यांना पनवेल तहसिल कार्यालयात भेटण्यासाठी गेलो त्यावेळी मी सदर कार्यालयात गेल्यानंतर नायब तहसिलदार श्रीमती राजश्री जोगी यांना भेटुन त्यांचेकडे माझे फाईलबाबत चौकशी करुन त्यांना टेनन्सी विभागाकडून प्राप्त झालेली लेजर कॉपी दाखवीली त्यावेळी त्यांनी सदर कार्यालयात उपस्थित असलेल्या अनिल नामक कर्मचा-यास बोलावुन त्यांना माझी फाईल तहसिलदार यांच्या केबीनमधुन बाहेर घेवुन येण्यास सांगीतले त्याचप्रमाणे अनिल हा माझी फाईल घेवुन आल्यानंतर श्रीमती जयश्री जोगी यांनी सदर फाईलचे कागदपत्रे बघण्याबाबत अनिल यांना सांगीतले. त्यानंतर मी अनिल यांच्याकडे विचारणा केली असता अनिल यांनी सदरची फाईल महसुल सहाय्यक किरण गोरे यांना दाखविली त्यावेळी मी किरण गोरे तसेच श्री नकाशे यांच्याकडे फाईल बाबत विचारणा केली असता त्यांनी फाईलमधील नोटींग बघुन अर्जामध्ये क्युरी काढली. असल्याचे मला सांगीतले. त्यावेळी मी कीरण गोरे यांना 94/2 चे टेनन्सी ऑफीसमध्ये 32म; चे पैसे भरणा केली असुन तलाठयांच्या चुकीमुळे नोंद झाली नसल्याबाबत सांगीतले तसेच किरण गोरे यांना याव्यतिरीक्त दुस-या सर्वे नंबरची जमिनीची कागदपत्रे पुर्ण असल्याने दोन्ही होत असेल तर वेल ॲड गुड अण्णा..... दोन्हीचं बोला......,, अशी विचारणा केली त्यावेळी किरण गोरे यांनी मला दोन्हींचे तर मी ऑलरेडी तुला बोललेलो आहे,, असे सांगीतले त्यावर मी किरण गोरे यांना ,,ऐंशी हजार ना तुम्ही वन टाईम बोललेलात ना अशी विचारणा केली त्यावर किरण गोरे यांनी त्यास होकार देत ,, वनटाईम त्याचेत प्रॉब्लेम नाय असे सांगीतले. त्यावर मी त्यांना ठीक



Scanned with OKEN Scanner

आहे बोला ना मग काय कधी आणु वगैरे काय.... एक तासाभरात येतो ,, असे बोलले असता त्यांनी माझ्याकडे फाईल मागीतली. त्यावेळी मी त्यांना सर्वे नं 44वरील जमीनीचे कागदपत्र पुर्ण असल्याने त्याची नोंद घेण्याबाबत विनंती केली असता ,किरण गोरे यांनी मला ह्याचे पन्नास टक्के करा, असे बोलुन त्याची डाव्या हाताची चार बोटे मला दाखवीली त्यावेळी मी त्यांचेकडे खात्री केली असता किरण गोरे यांनी मला ह्याचे पन्नास टक्के कर हे डब्बल होईल, मी तुला कीती सांगीतलेले ...... सगळ्यापेक्षा जास्ती सांगीतलेले असे सांगीतले. त्यावेळी मी त्यांना ,, नाय हा तेवढ बोललात तुम्ही ,ऐंशी हजार बोललेलात.... मी सांगु का याच एक बघा ना असे बोलुन त्यांनी दोन सर्वे नंबरचे नोंदीसाठी ऐंशी हजार सांगीतले असुन एका सर्वे नंबरसाठी रक्कम कमी करण्याची विनंती केली असता किरण गोरे यांनी मला कमी होईल सोडुन दे , पन्नास टक्के होईल असे बोलुन रक्कम कमी करण्यास नकार दिला. त्यावेळी मी किरण गोरे यांचेकडे चाळीस हजारामध्ये मँडमपण अशी विचारणा केली असता गोरे यांनी मला सगळेसगळे असे सांगीतले. त्यानंतर मी किरण गोरे यांचेकडे चाळीस हजाराबाबत खात्री केल्यानंतर त्यांना एका तासात येतो असे सांगुन तहसिल पनवेल कार्यालया बाहेर येवुन माझे पाठोपाठ पंच क्र 1जोशी असे माझ्या रीक्षामध्ये बसुन पडताळणी पथकाच्या ठीकाणी परत आले

तहसिल कार्यालय पनवेल येथील महसुल सहाय्यक किरण गोरे यांनी माझे वडीलोपार्जीत मौजे गिरवले ता पनवेल जि रायगड येथील जमीन भोगवटादार वर्ग क्र एक प्रमाणे नोंद घेण्यासाठी माझेकडे रुपये 40,000 लाचेच्या रक्कमेची मागणी करुन सदर लाचेची रक्कम एका तासात घेवुन येण्यास सांगीतले असल्याचे निष्पन्न झाले.

त्यानंतर श्री किरण गोरे यांच्याविरूध्द सापळा आजमविण्यात येणार असल्याबाबत पोनि संतोष पाटील यांनी मला सांगीतले. तसेच सापळा कारवाईपुर्वी सापळापुर्व कार्यवाही करण्यात येणार असल्याचे सांगीतले त्याप्रमाणे पोनि संतोष पाटील यांनी मला व पंचाना सापळापुर्व कारवाईबाबत थोडक्यात माहीती देवुन सदरची सापळापुर्व कारवाई खाजगी वाहनामध्ये करण्यात आली

त्यानंतर सापळा कारवाई दरम्यान मी व पंच क्र 1जोशी यांचेसह तहसिल कार्यालय पनवेल येथे गेलो त्यानंतर मी महसुल शाखेमध्ये जावुन कीरण गोरे यांना भेटुन त्यांना लाचेची रक्कम आणल्याबाबत इशारा केला त्यावेळी किरण गोरे यांना मला सदर ठीकाणी गर्दी असल्याने,, इथे नको थांब.... काय पण नको करु.... बाहेर जा,, असे बोलुन बाहेर थांबण्यास सांगीतले त्याप्रमाणे मी महसुल शाखेच्या बाहेर येवुन मोकळ्या पँसेजमध्ये जावुन थांबलो . काहीवेळाने कीरण गोरे हे महसुल शाखेच्या बाहेर येवुन सदर पँसेज मधील टॉयलेटच्या दिशेने गेले व मला पाठीमागुन येण्याचा इशारा केला परंतु त्यावेळी सदर ठीकाणी गर्दी असल्याने मी महसुल शाखेच्या बाहेर थांबुन राहीलो. त्यानंत किरण गोरे हे पुन्हा महसुल शाखेजवळ येवुन महसुल शाखेच्या बाजुस असलेल्या जिन्यावर जावुन थांबले .त्यावेळी मी सदर जिन्याच्या जवळ जावुन त्यांना आवाज दिला त्यावेळी किरण गोरे यांनी त्यांचे डावे हाताने पैशांबाबत विचारणा केली असता मी माझे उजवे हाताने माझे पँटचे पुढील उजव्या खिशातील लाचेची रक्कम ठेवलेला लखोटा बाहेर काढुन तो किरण गोरे यांचेसमोर धरुन किरण गोरे यांना,, चाळीस हजार आहेत मोजुन घ्या असे बोललो ,, त्यावेळी किरण गोरे यांनी चाळीस अशी विचारणा करुन लाचेची रक्कम ठेवलेला लखोटा त्यांचे डावे हाताने स्विकारुन नेसुस पँटच्या पाठीमागील डाव्या खिशात ठेवली त्यांनतर मी किरण गोरे यांना फाईल कधीपर्यंत होईल, याबाबत विचारणा केली असता किरण गोरे यांनी मला उद्या असे सांगीतले. त्यावर मी त्यांना होकार देवुन निघत असताना किरण गोरे यांनी मला एकच हा , असे सांगीतले असता मी त्यांना होकार देवुन जिन्यावरुन महसुल शाखेत येते वेळी माझे डावे हातानी उजव्या हाताचे शर्टची बाही वर करुन लोकसेवक किरण गोरे यांनी लाचेच्या रक्कमेचा स्विकार केला असल्याबाबत सापळा पथका पुर्वनियोजित इशारा केला. त्यानंतर सापळा पथकाने किरण गोरे यांना 17.44वा पंचांसमक्ष लाचेच्या रक्कमेसह रंगेहात ताब्यात घेतले आहे.

त्यानंतर आरोपी लोकसेवक यांच्याविरुध्द पनवेल तहसिल कार्यालय येथे सापळा पंचनामा कारवाई पुर्ण करण्यात आलेली आहे.

तरी माझे वडीलांचे नावे वडीलोपार्जित शेती असलेली जमीन मुंबई कुळव्यवस्थापन व शेतीजमिनी कायदेअंतर्गत जमिनींची नोंद कमी करुन (भोगवटादार वर्ग -2) वरुन सदर जमीनीची भोगवटादार वर्ग -1अशी दोन स्वतंत्र सर्व क्रमांकाच्या जमिनींची नोंद करण्यासाठी पनवेल तहसिल कार्यालयातील लोकसेवक किरण गोरे महसुल सहाय्यक यांनी माझेकडे त्यांचे स्वता:साठी तसेच वरीष्ठांसाठी रुपये 80,000/- लाचेच्या रक्कमेची मागणी करुन तडजोडीअंती एका सर्वे क्रमांक 44मधील जमिनीची नोंद करुन देतो म्हणुन रुपये 40,000/-लाचेची मागणी केली. व लोकसेवक श्री किरण गोरे यांनी सदर लाचेची रक्कम रुपये 40,000/-पनवेल तहसिल कार्यालयात स्विकारल्यानंतर पंच ,साक्षीदार यांचेसमक्ष सापळा पथकांनी रंगेहात पकडण्यात आले आहे म्हणुन माझी किरण अर्जुन गोरे वय 48वर्षे , महसुल सहाय्यक ,तहसिल कार्यालय पनवेल जि रायगड ,रा क्लासिक कल्पतरु हौं. सोसायटी ,रुम नं 04,सेक्टर 16,नविन पनवेल ता पनवेल जि रायगड यांचेविरुध्द कायदेशीर फिर्याद आहे



Scanned with OKEN Scanner

माझा वरील फिर्यादी जबाब मराठीत माझेसमक्ष संगणकावरती टंकलिखीत केलेला असुन तो मी वाचुन पाहीला असता माझे सांगणेप्रमाणे बरोबर व खरा आहे.

समक्ष
संतोष पाटील
पोलिस निरीक्षक अँटीकरप्शन ब्युरो नवी मुंबई

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

or (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):
sushama chhaburao patil
**Rank** (पद): SP (Superintendant of Police) **No.**(क्र.): DGPSCP7601
**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

सुषमा छबुराव पाटील
**Signature of Officer In charge, Police Station** पोलीस ठाणे, मुंबई
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): Nitin Vasantrao Tha
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): POBN67690



Scanned with OKEN Scanner